# समग्र शिक्षा, शिक्षण विभाग (प्राथ) जिल्हा परिषद अहमदनगर

## पर्यायी शिक्षण

**उद्देश -** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ लागू करण्यात आला आहे. सदर कायदयाच्या अनुषंगाने राज्य नियमावली २०११ तयार केली असून ती दिनांक ११ ऑक्टोंबर २०११ पासून राज्यात लागू केली आहे. त्यामधील तरतूदीनूसार ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालक प्राथमिक शाळेत दाखल केले पाहिजे. परंतु यामध्ये स्थलांतर तसेच आजारपण व वय जास्त यांसारख्या कारणांमूळे मुले शाळाबाहय होतात. यासाठी समग्र शिक्षा अभियान अंतर्गत पुढील योजना सुरु आहेत.

### शाळाबाहय व स्थलांतरीत विदयार्थी : (Out of School & Migrated Children)

शाळाबाहय झालेल्या विदयार्थ्यांना शाळेत वयानुरुप वर्गात दाखल केले जाते. त्यासाठी त्या विदयार्थ्यांना तीन महिने, सहा महिने असे विशेष प्रशिक्षण देवून वयानुरुप वर्गात दाखल करुन त्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाते. साधारणपणे ऑक्टोबर ते मार्च या सहा महिन्याच्या कार्यकाळामध्ये पालकांचे व्यवसायानिमित्त किंवा काही कामधंदयानिमित्त स्थलांतर होत असते. त्यांच्याबरोबर त्यांचे मुलही स्थलांतर करत असतात. त्यामुळे मुले शाळाबाहय होतात. या विदयार्थ्यांना ज्या ठिकाणी स्थलांतर झाले आहे त्या ठिकाणच्या नजीकच्या शाळेमध्ये त्यांना प्रवेश दिला जातो. त्यांच्या प्रगतीची नोंद शिक्षण हमी कार्डवर घेतली जाते.

### वाहतूक भत्ता (Transport Allowance) :

६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण देण्याच्या प्रयोजनार्थ मोफत परिवहन सुविधा किंवा अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते. विदयार्थ्यांना त्यांच्या नजीकच्या नियमित प्राथमिक / उच्च प्राथमिक शाळेत येण्या-जाण्यासाठी एस.टी. ची सोय अथवा मासिक एस.टी. पासची सोय ज्या ठिकाणी उपलब्ध नसेल तेथे अधिकृत खाजगी वाहनाची सुविधा पुरविण्यासाठी केंद्र शासनाकडून वाहतूकीकरीता अनुदान १० महिन्यासाठी पुरविण्यात येते.

## शाळा प्रवेशोत्सव :

RTE २००९ नुसार प्रत्येक बालकाचे नाव पटावर नोंदवले जाणे आवश्यक आहे. पटावर नोंदविले गेलेले प्रत्येक बालक दररोज शाळेत उपस्थित राहून गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याचा हक्क आता कायदयाने मान्य केला आहे.

दीर्घ सुट्टीच्या आनंदानंतर विद्यार्थ्यांना शाळा हवीहवीशी वाटली पाहिजे. साधारणपणे दि.१५ जून रोजी (विदर्भ वगळता) राज्यात शाळा प्रारंभ होत असते. हा प्रारंभ चैतन्यमय व उत्साहवर्धक झाल्यास शिक्षक आणि विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रातील गुणात्मक वाटचालीसाठी गती मिळते यासाठी जिल्हयात शाळा प्रवेशोत्सव साजरा केला जातो. त्यामध्ये विद्यार्थ्यांचे विशेष स्वागत केले जाते. त्यासाठी वेगवेगळे कार्यक्रम, प्रभातफेरी, शाळा सुरु होण्याच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पाठयपुस्तक वितरण, मोफत गणवेश, विद्यार्थ्यांना फुले देणे यासारख्या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.